# कोल्हापूरातील आर्य समाज: एक दृष्टीक्षेप

**डॉ. अर्चना श्रीराम जाधव,** सहाय्यक प्राध्यापक व विभागप्रमुख इतिहास विभाग,
शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालय, मिरज,
शिवाजी विद्यापीठ संलग्नित, कोल्हापूर, archanajadhav1333@gmail.com

**प्रस्तावना:**

कोल्हापूर संस्थानचे अधिपती राजर्षी छत्रपती शाहू महाराज (इ.स. १८९४ ते १९२२) यांनी कोल्हापूर संस्थानची राज्यसूत्रे हाती घेतली तेव्हा कोल्हापूर संस्थान उद्दाम ब्रिटीश अधिकारी, भ्रष्ट्राचारी उच्चवर्णीय नोकरदार,बहुजन समाजाचे अज्ञान आणि अंधश्रद्धा या चक्रव्यूहात सापडले होते. राज्यारोहणानंतर छ.शाहू महाराजांनी बहुजन समाजाच्या प्रगतीसाठी सामाजिक,शैक्षणिक,आर्थिक, धार्मिक सुधारणा करण्यावर भर दिला. राज्यारोहणानंतर छ. शाहू महाराजांनी बहुजन समाजाच्या प्रगतीसाठी सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, धार्मिक सुधारणा करण्यावर भर दिला. हे कार्य करीत असताना शाहू महाराजांचा सत्यशोधक समाज,प्रार्थना समाज, थिऑसॉफिकल सोसायटी, आर्य समाज, ब्राह्मो समाज या चळवळींशी संबंध आला. तथापि आर्य समाजाने उत्तर हिंदुस्थानात केलेल्या शैक्षणिक, सामाजिक व राष्ट्रोद्धाराच्या कार्यामुळे प्रभावित होऊन शाहू महाराज आर्य समाजाकडे विशेषत्वाने आकर्षिले गेले.

कोल्हापूरात शाहू महाराजांच्या आश्रयाखाली स्थापन झालेल्या आर्य समाजाने शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. गुरूकुल, विविध शाळा, वैदिक शिक्षण, वाचनालय, वृत्तपत्र, व्याख्याने इत्यादी माध्यमातून शिक्षणप्रसार व सांस्कृतिक जागृतीचे, समाजप्रबोधनाचे कार्य केले. आर्य समाजाच्या विविध शाखांमधून हजारो गरीब व होतकरू विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतले व आजही घेत आहेत.

**संशोधनाचा हेतू:**

१. कोल्हापूर संस्थानचे अधिपती राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि आर्य समाज यांचे संबंध अभ्यासणे.

२. कोल्हापूरातील आर्य समाजाने शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात दिलेले योगदान अभ्यासणे, मूल्यमापन करणे हा या शोधनिबंधाचा हेतू आहे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर केला असून आवश्यक त्याठिकाणी साधनांचे अंतर्गत व बहिरंग परीक्षण करून संशोधनात वस्तुनिष्ठता आणण्याचा प्रयत्न केला आहे.

संदर्भ साधने:

या शोधनिबंधासाठी प्राथमिक व दुय्यम संदर्भ साधनांचा उपयोग केला आहे. कोल्हापूर पुराभिलेखागारातील हुजूर ठराव बुक्स,कोल्हापूर स्टेट गॅझेट इत्यादी मूळ प्रकाशित व अप्रकाशित संदर्भ साधनांचा उपयोग केला आहे.दुय्यम संदर्भ साधनांमध्ये अनेक संदर्भ ग्रंथ, अहवाल,वृत्तपत्र यांचा वापर केला आहे.

**आर्य समाजाची स्थापना:**

आधुनिक भारताच्या धार्मिक व सामाजिक सुधारणा चळवळीच्या इतिहासात आर्य समाजाचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. आर्य समाजाने हिंदू धर्मातील वाईट चालीरीती, रूढी परंपरा यावर टिका केली, वैदिक धर्माचे श्रेष्ठत्व पटवून देऊन हिंदूंमध्ये नवचैतन्य निर्माण केले. स्वामी दयानंद सरस्वती यांनी वैदिक धर्माचे पुनरूज्जीवन करण्यासाठी आणि वैदिक तत्वज्ञानाच्या प्रचारासाठी १० एप्रिल, १८७५ रोजी काकडवाडी, मुंबई येथे आर्य समाजाची स्थापना केली.[१] सन १८७७ मध्ये पंजाबमधील लाहोर येथे त्यांनी आर्य समाजाची शाखा स्थापन केली व पुढे लाहोर हेच समाजाचे केंद्र बनले. कालांतराने पंजाब, संयुक्त प्रांत, राजस्थान, गुजरात इत्यादी प्रांतात आर्य समाजाच्या शाखा स्थापन होऊन तेथे आर्य समाजास मोठी लोकप्रियता मिळाली.[२]

**आर्य समाज आणि महाराष्ट्र:**

आर्य समाजाची स्थापना मुंबईत झाली असली तरी मुंबई इलाख्यात आर्य समाजाची चळवळ फारशी वाढली नाही.[३] महाराष्ट्रातील वेदाभिमानी ब्राह्मण वर्गाचा आर्य समाजास विरोध होता, कारण वेदावरील ब्राह्मणांची मक्तेदारी आर्य समाजास मान्य नव्हती. आर्य समाजाने वेदाध्ययनाचा अधिकार स्त्रियांसह सर्व शुद्रातिशूद्रांना आहे, असे प्रतिपादन केले, जातिभेद, अस्पृश्यतेचा निषेध केला, तर स्त्रीशिक्षण, विधवा पुनर्विवाह यांचा पुरस्कार केला.[४] आर्य समाजाच्या या पुरोगामी विचारांचा प्रभाव

लोकहितवादी, न्या. रानडे यासारख्या सुधारकांवरही पडला होता. स्वामी दयानंद सरस्वतींच्या पुणे येथील व्याख्यानाने तर सर्व लोक भारावून गेले होते.[५] मराठवाडयात मात्र आर्य समाजाच्या शाखा प्रभावीपणे काम करीत होत्या.

**शाहू महाराज आणि आर्य समाजः**

शाहू महाराजांनी जेव्हा सामाजिक सुधारणांकडे लक्ष दयायला सुरूवात केली तेव्हा आर्य समाज ही देशातील एक प्रमुख सामाजिक व धार्मिक चळवळ बनली होती. सन १९०२ मध्ये जेव्हा इदार संस्थानचे नरेश सर प्रतापसिंह यांनी शाहू महाराजांना आर्य समाजाच्या तत्त्वज्ञानाचा प्रथम परिचय करून दिला तेव्हा कोल्हापूरात वेदोक्त प्रकरणाचा भडका उडाला होता.[६] आर्य समाज सर्व हिंदूंचा वेदोक्ताचा अधिकार मान्य करी आणि तो अधिकार महाराष्ट्रातील ब्राह्मणांनी शाहूंना देण्याचे नाकारले होते. तसेच सत्यशोधक समाजाप्रमाणे अस्पृश्यतेचे निर्मूलन करणे हे आर्य समाजाचे ध्येय होते. म्हणून आर्य समाजास शाहू महाराजांनी पाठिंबा दिला.[७] बडोदयाचे आर्य समाजाचे प्रचारक पंडित आत्माराम यांच्या भेटींमुळेही शाहू महाराज आर्य समाजाकडे अधिकाधिक आकृष्ट झाले. परिणामी शाहू महाराजांनी आर्य समाजाचा स्वीकार केला.[८]

वैदिक वाङ्मयात चातुर्वर्ण्य नाही, अस्पृश्यता नाही हे आर्य समाजाचे विचार महाराजांना प्रभावित करणारे होते. अशा वैशिष्टयांसाठी आर्य समाजाचे आपल्याला आकर्षण वाटते असे महाराजांनी सभा परिषदांमधून बोलवून दाखविले. आर्य समाजाच्या परिषदांना ते आवर्जून उपस्थित राहत. आर्य समाजाने आपणांस सामाजिक व धार्मिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी नवा मार्ग दाखविला, असे प्रतिपादन महाराज अशा परिषदांमधून अनेकदा करीत असत.[९]

**कोल्हापूरात आर्य समाजाची स्थापना :**

शाहू महाराजांच्या आश्रयाने कोल्हापूरात आर्य समाजाची स्थापना ३ एप्रिल, १९१८ रोजी झाली.[१०] या कामी बडोदयाचे पंडित आत्माराम यांचे सहकार्य शाहू महाराजांना लाभले.

**शैक्षणिक कार्यः**

कोल्हापूरात आर्य समाजाने गुरूकुल, विद्यालये, हायस्कूल, वैदिक शिक्षण, वाचनालय, वृत्तपत्र इत्यादी अनेक माध्यमातून शिक्षणप्रसाराचे कार्य केले.

कोल्हापूरात आर्य समाजाची स्थापना होण्यापूर्वीच सन १९१७ मध्ये आग—याहून आलेल्या स्वामी परमानंद यांच्या मार्गदर्शनाखाली कोल्हापूरजवळील केरले येथे प्राथमिक शाळा व गुरूकुल यांची स्थापना होऊन आर्य समाजाचे कार्य सुरू झाले होते.[११] महाराजांनी जानेवारी १९१८ मध्ये आर्य समाजाच्या शाळांसाठी दरसाल तीन हजार रूपये व गुरूकुलासाठी दोन हजार रूपये मिळून ५ हजार रूपये वार्षिक देण्याचे मंजूर केले होते.[१२]याशिवाय मे १९१८ मध्ये पद्माळा थट्टीच्या रूपये ६०,००० किंमतीच्या इमारती व जमिनी आर्य समाजास दिल्या. थट्टीच्या इमारतीत आर्य समाजाचे गुरूकुल व फर्स्ट ग्रेड अॅग्लो व्हर्नाक्युलर स्कूल ठेवण्यात आले. केरलीची शाळा व गुरूकुलही या संस्थेस जोडण्यात आले. शिवाय शुक्रवार पेठेतील पाटगावकर बुवाच्या मठात आर्य समाजाची चौथीपर्यंतची मराठी शाळा सुरू करण्यात आली.[१३] हे सर्व शैक्षणिक कार्य संयुक्त प्रांतातील आर्य प्रतिनिधी सभेकडे सोपविले गेले होते.

याशिवाय शाहू महाराजांनी राजाराम हायस्कूल, राजाराम कॉलेज, ट्रेनिंग कॉलेज, पाटील—तलाठी क्लास वगैरे संस्था आर्य समाजाकडे चालविण्यासाठी दिल्या होत्या. १९१९ ते १९२६ या कालावधीत या संस्था आर्य प्रतिनिधी सभा, यु. पी. मार्फत चालविल्या जात होत्या. याकाळात या शिक्षणसंस्थांची उल्लेखनीय प्रगती झाली. राजाराम महाराजांच्या काळात सन १९२६ मध्ये या शिक्षणसंसीा कोल्हापूर दरबारने पुन्हा आपल्या ताब्यात घेतल्या.[१४]

आर्य समाजामार्फत गुरूकुलाप्रमाणेच कर्नल वुडहाऊस अनाथालय चालविले जात होते. अनाथालयात जवळ—जवळ २५ विद्यार्थ्यांची मोफत जेवण्याची, राहण्याची सोय केली होती.[१५] शाहू महाराजांनी सन १९२० मध्ये अनाथालयातील विद्यार्थ्यांच्या जेवण, कपडे, पुस्तके वगैरेकरिता दरमहा सहाशे रूपयेप्रमाणे दरसालचे ७२०० रूपये दरसालचे बजेटमध्ये वाढविले होते व सदरच्या हौसची व्यवस्था आर्य समाजाच्या सुपरिंटेंडेंटकडे सोपविली होती.[१६]

कोल्हापूर संस्थानच्या विलीनीकरणानंतर शासनाकडून मिळणा—या अनुदानावर हे वसतिगृह सुरू आहे.

राजाराम कॉलेजला जोडून श्रीमंत व सरदार वगैरेंच्या मुलांसाठी 'सरदार बोर्डिंग' चालविले जात होते. हे वसतिगृहही शाहू महाराजांनी आर्य समाजाकडे चालविण्यास दिले होते.[१७]

कोल्हापूर आर्य समाजामार्फत गुरूकुल व कर्नल वुडहौस अनाथालयाबरोबरच शाहू दयानंद हायस्कूल (१९१८), शाहू दयानंद मोफत मराठी शाळा (१९१८), श्री दयानंद नि:शुल्क हिंदी विद्यालय

(१९३४), आर्य समाज बालमंदिर (१९७७), कै. बाळासाहेब कृ. पाटील हायस्कूल (१९८९), कौलव, श्री श्रद्धानंद व्यायामशाळा (१९३२), श्री शाहू मोफत वाचनालय (१९२६) या शाखा सुरू करण्यात आल्या.[१८] सर्व जातीच्या विद्यार्थ्यांना आर्य समाजाच्या शिक्षणसंस्थांमध्ये प्रवेश दिला जातो. गुरूकुलात राहणे, जेवणे व शिक्षण अशी तिहेरी सोय मोफत होती. या शिक्षणसंस्थांचा प्रामुख्याने जिल्हयातील ग्रामीण भागातील गरीब व मागासलेल्या वर्गातील विद्यार्थ्यांना उपयोग झाला आहे व आजही होत आहे.

आजही आर्य समाज शिक्षण संस्थेमार्फत शाहू दयानंद हायस्कूल, शा. कृ. पंत वालावलकर विद्यार्थी वसतिगृह (गुरूकुलाचे १९८६ मध्ये झालेले नामांतर), ज्युनिअर कॉलेज, बालमंदिर, क्रेऑन्स इंग्लिश मिडियम स्कूल इत्यादी शाखांमार्फत ग्रामीण भागातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे कार्य अव्याहतपणे सुरू आहे.

आर्य समाजाने कोल्हापूरात हिंदी भाषेचा प्रसार व्हावा म्हणून आपल्या शिक्षणसंस्थांमध्ये हिंदी शिकविण्याची सोय केली. तसेच श्रीमत दयानंद नि:शुल्क हिंदी विद्यालय, हिंदी प्रचार मंडळ, हिंदी ग्राम प्रचार वर्ग याद्वारे हिंदी भाषेचा प्रचार करण्याचे कार्यही स्वातंत्र्यपूर्वकाळात केले.

समाजामार्फत 'आर्यभानु' नावाचा छोटा छापखाना काढला होता व या छापखान्यातून 'आर्य' नावाचे पाक्षिक प्रकाशित केले जात होते. डॉ. बाळकृष्ण यांचे काही ग्रंथ याच छापखान्यात छापले होते. उदा. शिवाजी द ग्रेट.[१९]

सामाजिक व धार्मिक कार्य:

कोल्हापूर आर्य समाजाने सामाजिक, धार्मिक क्षेत्रातही उल्लेखनीय कार्य केले. आर्य समाजाने जातीभेदाचे निर्मूलनासाठी प्रयत्न केले, आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन दिले, तसेच अस्पृश्यांच्या उद्धारासाठी प्रयत्न केले.

आर्य समाजामध्ये सर्व जातीधर्माचे लोक समाविष्ट होते. आर्य समाज सर्व जातींना वेदाध्ययनाचा अधिकार आहे असे मानतो. समाजातर्फे सामाजिक–धार्मिक जागृतीसाठी कोल्हापूरात तसेच आसपासच्या ग्रामीण भागात प्रवचने, व्याख्याने होत.

आर्य समाजाने शुद्धीकरणाचे (बाटवलेल्या हिंदूना पुन्हा शुद्ध करून हिंदू धर्मात घेण्याचे) काम मोठया प्रमाणावर केले. त्यांच्या पुनर्वसनासाठी प्रयत्न केले. हिंदू महासभेच्या सहकार्याने ११ हजार लोकांचे शुद्धीकरण केले होते. शुद्धीकरणाद्वारे हिंदू धर्माचे पुररूज्जीवन करण्यात आर्य समाजाने मोठा हातभार लावला.[२०]

आर्य समाजाचा सार्वत्रिक प्रसार व्हावा यासाठी समाजामार्फत कोल्हापूर, सांगली, सातारा, बेळगाव जिल्हयात प्रचारक पाठविले जात होते. वेदप्रचाराचे कार्य, होमहवन, श्रावणी समारंभ असे धार्मिक कार्यक्रम आर्य समाजामार्फत राबविले जात. आर्य समाजाने मूर्तिपूजेला विरोध केला. त्यासाठी कोल्हापूर आर्य समाजामार्फत व्याख्यानांचे आयोजन केले जात होते. पण या कामात त्यांना यश आल्याचे दिसत नाही. बहुतेक समाज मूर्तिपूजेस अनुकूल होता.

**मूल्यमापन:**

कोल्हापूरात आर्य समाजाने शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. आर्य समाजाच्या शिक्षणसंस्थांमधून सर्व वर्गातील मुलांना मोफत शिक्षण दिले जात होते. त्यामुळे बहुजन समाजातील मुलांना शिक्षण घेण्याची अधिक सुविधा उपलब्ध झाली. आजही आर्य समाजाच्या शिक्षणसंस्थांचा फायदा गरीब व मागासलेल्या वर्गातील विद्यार्थ्यांना तसेच जिल्हयातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मोठया प्रमाणावर होत आहे. वसतिगृहामध्ये विद्यार्थ्यांच्या राहण्याची व जेवणाची मोफत सोय आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळात हिंदी भाषेच्या प्रसाराचे काम केले. आर्य समाजाच्या शिक्षणप्रसाराच्या कार्यामध्ये राजाराम कॉलेजचे माजी विद्वान प्राचार्य, थोर इतिहासकार व कोल्हापूर आर्य समाजाचे माजी अध्यक्ष कै. डॉ. बाळकृष्ण व आर्य समाजाचे माजी मंत्री कै. डी. टी. मालक यांचा मोलाचा वाटा आहे. याशिवाय डॉ. ए. सी. बोस, प्रो. जी. एस. देशपांडे, डॉ. एस. व्ही. काटे, दत्ताजीराव शेळके, एस. व्ही. डोणे, दादासाहेब हळदकर, केशवराव भोसले, बाळासाहेब पाटील कौलवकर अशा अनेक कार्यकर्त्यांचे श्रम संस्थेच्या उन्नतीसाठी कारणीभूत ठरले.

आर्य समाज संस्थेच्या माजी विद्यार्थ्यात खासदार के. एल. मोरे, आर्य समाजाचे मंत्री डी. टी. मालक, एच. जी. चिले(जनता शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेचे संस्थापक), मा. कृ. गुरव (शेती खात्यात प्रथम श्रेणीचे राजपत्रीत अधिकारी), डॉ. आय. जी. चव्हाण (अमेरिकेतील मिचीगन विद्यापीठाची दुग्ध व्यवसायातील डॉक्टरेटची पदवी मिळविणारे भारतातील पहिले विद्यार्थी) यांचा समावेश होतो.

आर्य समाजाने सामाजिक व धार्मिक क्षेत्रात केलेले कार्यही तत्कालीन परिस्थितीत महत्वाचे ठरले. आर्य समाजाने समाजातील जातीभेद, अस्पृश्यता, विषमता, अंधश्रद्धा दूर करण्याचा आणि

सामाजिक समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. शुद्धीकरणाचे काम मोठया प्रमाणावर केले. याद्वारे हिंदू धर्मप्रसाराचे मोठे कार्य केले. आर्य समाजाचा कोल्हापूरच्या सार्वजनिक जीवनात काही काळ चांगला प्रभाव असल्याचे आढळते.

**संदर्भ:**

१. आर्य. पं. धर्मवीरजी; *आर्य समाज एका दृष्टीक्षेपात,* छत्रपती शिवाजी राष्ट्रीय प्रकाशन, १९८५, पृ. २.
२. छाब्रा जी. एस.; *ॲन ॲडव्हान्स स्टडी इन द हिस्ट्री ऑफ मॉडर्न इंडिया,* खंड २, स्टेरलिंग पब्लिशर्स लि., न्यू दिल्ली, १९७१, पृ. ३६९.
३. जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री (सं.); *मराठी विश्वकोश,* खंड २, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९७६, पृ. २४६.
४. पवार जयसिंगराव (सं.); *राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ,* प्रस्तावना राजर्षी शाहू छत्रपती— जीवन व कार्य, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, २००१, पृ. १३५.
५. जोशी श्रीपाद (अनुवादक); सत्यार्थ प्रकाश, मूळ लेखक महर्षी दयानंद सरस्वती, ११ वी आवृत्ती, आर्य समाज पिंपरी, पुणे, १९९९, प्रस्तावना, पृ. २.
६. पवार जयसिंगराव (सं.); उपरोक्त, पृ. १३६.
७. कीर धनंजय; राजर्षी शाहू छत्रपती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७९, पृ. ३२०,३२२.
८. पवार जयसिंगराव (सं.); उपरोक्त, पृ. १३५.
९. गर्गे स. मा.; शाहू महाराज आणि आर्य समाज, राजर्षी शाहू गौरव ग्रंथ (सं.) पी. बी. साळुंखे, राजर्षी शाहू जन्मशताब्दी प्रकाशन, शिक्षण व सेवायोजन विभाग, महाराष्ट्र राज्य मुंबई, १९८८, पृ. ४२४.
१०.कोल्हापूर पुराभिलेखागार, हुजूर ऑफिस, मुलकी ठराव बुक, फसली सन १३२८, शाळा ठराव क्रमांक ८२७, दि. २२—५—१९१८.
११.पवार जयसिंगराव (सं.); उपरोक्त, पृ. १३८.
१२.कोल्हापूर पुराभिलेखागार, हुजूर ऑफिस, जनरल ठराव बुक, फसली सन १३२७—२८, शाळा ठराव क्रमांक ७४८, दि. १५—५—१९१८, शाळा ठराव क्रमांक ५५५, दि. २३—१—१९१८.
१३.कोल्हापूर पुराभिलेखागार, हुजूर ऑफिस, मुलकी ठराव बुक, फसली सन १३२८, शाळा ठराव क्रमांक ८२७, दि. २२—५—१९१८, शाळा ठराव क्रमांक ८२०, दि. १४—५—१९१८.
१४.जाधव अर्चना; कोल्हापूरातील आर्य समाजाचे कार्य, अप्रकाशित एम्. फिल्. शोधनिबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, डिसेंबर, २००१, पृ. ३२.
१५.'आर्यतेज' सुवर्ण महोत्सव स्मरणिका, आर्य समाज, कोल्हापूर, १९७३, पृ. ६५; जाधव अर्चना; उपरोक्त, पृ. ३२.
१६. मुडबिद्रीकर बी.एस्.;*राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे शैक्षणिक व सामाजिक हुकुमनामे,* कोल्हापूर जिल्हा माध्यामिक व उच्च माध्यामिक शाळा मुख्याध्यापक संघ, कोल्हापूर १९९४—९५, पृ ५९—६०.
१७.कोल्हापूर पुराभिलेखागार, हु. ऑ., ज. ठ. बुक, फसली सन १३३०, जनरल खाते ठराव नं. ६६९, ता. २३—०३—१९२१.
१८.जाधव अर्चना; उपरोक्त, पृ. ३१—४३.
१९.जाधव अर्चना; उपरोक्त, पृ. ४२; साप्ताहिक हंटर, कोल्हापूर, दि. १९—३—१९२६.
२०.साप्ताहिक धूमकेतू, डी. टी. मालक गौरव विशेषांक, (सं.) राजाराम आप्पा जोशी, कोल्हापूर, १ मे, १९७९; ताकभाते महेश; ''निरपेक्ष समाजसेवक डी. टी. मालक'', *कोल्हापूरची मोठी माणसं,* (सं.) भिकशेठ पाटील, कल्पक प्रकाशन मंदिर, कोल्हापूर, १९८३, पृ. ११६.